© 2022 IJRTI | Volume 7, Issue 10 | ISSN: 2456-3315

# ग्राम विकासात पंचायत राजव्यवस्थेची भुमिका (जळगाव जिल्ह्याच्या विशेष संदर्भात)

**डॉ.ताराचंद माधव सावसाकडे**

**राज्यशास्त्र विभाग, प्रमुख**
**धनाजी नाना महाविद्यालय,**
**फैजपूर जि.जळगाव ४२५५०३**

**सारांशः-**

कोणत्याही देशात ग्रामीण समाज उल्लेखनीय कामगिरी बजावीत असतो. अन्नधान्ये व इतर कच्चा माल यांचे उत्पादन ग्रामीण भागातच होत असून शहरांची गरज ग्रामीण उत्पादनातूनच भागविली जाते. शिवाय शहरांतील औद्योगिक व्यवसायांना श्रमिकांचा पुरवठा ग्रमीण भागतूनच होत असतो. भारतासारख्या विकसनशील देशाला ग्रामीण भागाच्या विकासासाठी प्रयत्न करणे गरजेचे बनले आहे. त्यासाठी परंपराप्रीय ग्रामीण जनतेला आधुनिक शास्त्रीय दृष्टिकोण पटवून देऊन तिला आर्थिक विकासाच्या मार्गावर शक्य तितक्या लवकर आणण्याचे प्रयत्न शासन करीत आहे. त्यानुसार पंचायत राजच्या माध्यमातून विविध योजनाच्या सहाय्याने जळगाव जिल्ह्याच्या ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, पिण्याचे स्वच्छ पाणी, रोजगार कुटीरउद्योग,नविन तत्रज्ञानाच्या विकासात महत्वाची भुमिका पार पाडत आहे.

**मुळ शब्दः**- ग्रामीण,विकास, पंचायत राज, महिला, योजना.

**प्रस्तावनाः-**

सर्व जगभर शहरांचा सतत विकास होत असूनसुद्धा जागतिक लोकसंख्येपैकी ग्रामीण भागात राहणाऱ्यांचे प्रमाण १९५० मध्ये ७९% पेक्षा थोडे अधिकच होते. भारतात १९६१ मध्ये ८२% लोक ग्रामीण भागात राहत होते, तर १९७१ मध्ये प्रमाण ८० ·१% होते. आज भारतात खेड्यांमध्ये ७०% टक्के जनता खेड्यांमध्ये राहते. त्यामुळे भारत हा खेड्यांचा देश म्हणून ओळखला जातो. ग्रामीण भागात शिक्षण, आरोग्य, पिण्याचे स्वच्छ पाणी, रोजगार कुटीरउद्योग,नविन तत्रज्ञानाचा विकास अपेक्षीत आहे. महात्मा गांधीच्या आदर्श राज्याचा ग्राम किंवा खेडे हा आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकशाही शासन पध्दती स्विकारून ग्रामीण जनतेला शासन कारभारात सहभागी करून घेण्यासाठी विकेंद्रकरणाची संकल्पना स्विकारण्यात आली. लोकांचा शासन कारभारात सहभाग वाढविण्याच्या हेतूने पंचायत राज व्यवस्था निर्माण करण्यात आली. या पंचायत राजच्या माध्यमातून ग्रामीण जनतेचे सर्वांगीन विकास घडवून आणण्यासाठी प्रयत्न करण्यात आले आहे. ग्रामीण भारताच्या विकासासाठी पंचायत राज व्यवस्थेचा पुरस्कार यांनी केला. खेड्यातील लोकांना रोजगारासाठी शहराकडे स्थलांतर करावे लागू नये. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर गरिबांचा कष्टकऱ्यांचा शेतकऱ्यांचा हा देश ज्या खेड्यातून उभा होतो ती खेळी कमी करण्यासाठी त्यांची सत्ता त्यांच्याच हातात

देण्याचा आग्रह करण्यात आला. आणि त्या आग्रहाचा अंतर्भाव भारतीय संविधानात असलेल्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये करण्यात आला.[१] पंचायत राज व्यवस्था हा भारतीय लोकशाही व्यवस्थेतील सर्वात खालचा महत्त्वाचा घटक आहे.

भारतात प्राचीन काळापासून पंचायत राज व्यवस्था अस्तित्वात आहे पंचायत राज व्यवस्थेचा मूळ उद्देश आपल्या गावचा राज्यकारभार स्वतः हाती घेणे हा आहे. पंचायत राज मध्ये विकेंद्रीकरण आणि त्या विकेंद्रिकरणातून विकास साध्य करणे होय.महात्मा गांधींच्या विचाराप्रमाणे त्यांच्या जन्मदिना पासून म्हणजे २ ऑक्टोंबर १९५२ रोजी ग्रामीण विकासासाठी सामुदायिक विकास कार्यक्रम सुरू करण्यात आला. सामुदायिक विकास कार्यक्रमाची उद्दीष्टे ग्रामीण जनतेचे जीवनमान उंचावणे त्यांच्यात मित्रत्वाचे वातावरण तयार करणे त्यांना काम मिळवून देणे ग्रामीण जनतेच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी प्रयत्न करणे, ग्रामीण जनतेच्या सहभागाने विकास घडवून आणणे[२] हे होते. सामुदायिक विकास योजना व राष्ट्रीय विस्तार सेवा योजना पाहिजे त्या प्रमाणात ग्रामीण जनतेचे सहकार्य मिळू शकले नाही. म्हणून केंद्र सरकारने त्यासंदर्भात गांभीर्याने विचार करून तसा अभ्यास करण्याकरता बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली पहिली समिती स्थापन केली.या समितीने १९५७ मध्ये त्रिस्तरीय पचायत राज व्यवस्थेची शिफारस केली. त्यानंतर १९५७ पासून २००० पर्यंत पंचायत राज व्यवस्थेला गतीमान करण्यासाठी विविध अभ्यास समिती व मूल्यमापन समित्यांची स्थापना केंद्र सरकार व महाराष्ट्र राज्य सरकार यांच्याकडून वेळोवेळी करण्यात आली.[३] महाराष्ट्रातील जळगाव जिल्ह्यात महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अधिनियम १९६१ नुसार व मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ नुसार पंचायत राज व्यवस्था लागू केल्यापासून आतापर्यंत ग्रामीण पातळीवर ग्रामीण विकासाच्या संदर्भात सकारात्मक आणि नकारात्मक बदल घडून आलेले दिसते. प्रस्तुत शोधनिबंधात महाराष्ट्र राज्याच्या जळगाव जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील विकासाचा अभ्यास करण्यात आला आहे.

**उद्दिष्टेः-**

१) ग्रामविकासाची व पंचायतराजची संकल्पना समजून घेणे.

२) पंचायतराज व्यवस्थेचा ऐतिहासिक पार्श्वभुमी व विकासाचा आढावा घेणे.

३) जळगाव जिल्ह्याच्या ग्रामीण पंचायत राज व्यवस्थेची माहीती जाणून घेणे.

४) पंचायतराज व्यवस्थेचे जळगाव जिल्ह्याच्या ग्रामीण विकासातील योगदान तपासणे.

**गृहीतकेः-**

१) ग्रामीण विकासाच्या प्रक्रीयेत पंचायत राजच्या माध्यमातून स्थानिक लोकांचा सहभाग वाढत आहे.

२) प्राचिन काळापासून भारतात पंचायत राजव्यवस्थेचा विकास झाला आहे.

४) जळगाव जिल्ह्याच्या ग्रामीण विकासात पंचायतराजची भुमिका महत्वपुर्ण आहे.

**संशोधन पध्दती:-**

प्रस्तुत शोध निबंधासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा उपयोग करण्यात आला असून ग्रामीण विकासासाठी शासनाने वेळोवेळी केलेले कायदे, घटनादुरुस्त्या, सदर्भ पुस्तके, संशोधकांनी केलेले संशोधन, मासिके, वृत्तपत्रे, शासनाची संकेतस्थळे यामधून माहिती गोळा करण्यात आलेली आहे.

**ग्राम विकासाची संकल्पना:-**

मानवी समाजाचे ग्रामीण समाज व नागरी समाज असे दोन मुख्य प्रकार पडतात. ग्रामीण समाज म्हणजे खेड्यातील लोकांचा समाज तर नागरी समाज म्हणजे शहरातील किंवा नगरातील लोकांचा समाज असे स्थुलमानाने म्हणता येते. ग्रामीण हा शब्द ग्रामीण समुदायशी निगडित आहे. भौगोलिक दृष्ट्या विशिष्ट स्वरुपाची वैशिष्ट्ये असणाऱ्या समुदायाला ग्रामीण भाग असे संबोधले जाते. काही समाज शास्त्रज्ञांच्या मते जे शहर नाही ते गाव होय. त्यालाच खेडे देखिल म्हटले जाते. जो जमिन कसतो त्याला खेडूत असे म्हटले जाते आणि अशा खेडुतांच्या समुदायाला खेडे असे म्हणतात. ज्या प्रादेशिक क्षेत्रातील समुदायाचा प्रमुख व्यवसाय आणिअ उदरनिर्वाहाचे साधन शेती आहे. तो ग्रामीण समुदाय होय.[४] ज्या भौगोलिक क्षेत्रातील पन्नास टक्क्याहुन अधिक लोकसंख्या शेती या प्रमुख व्यवसायावर अवलंबून आहे त्या क्षेत्राला ग्रामीण समजले जाते. विकास हा शब्द अर्थशास्त्रात जास्त परिचीत आहे. ग्रामीण विकासाच्या संदर्भात तीन घटकांचा समावेश करता येतो. यामध्ये कृषी विकास, आर्थीक विकास व ग्रामीण समुदायाचा सर्वांगीण विकास हे घटक महत्वाचे मानले जाते. आर्थीकदृष्ट्या दुर्बल घटकांच्या आर्थीक परिस्थितीत सुधारणा करणे म्हणजे विकास होय.

**व्याख्या:-**

१) ग्रामीण भागातील दुर्बल घटक म्हणजे छोटे शेतकरी,भुमीहीन शेतमजूर आणि ग्रामीण कारागीर यांच्या विकासावर भर देऊन ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे म्हणजे ग्रामीण विकास होय.

२) जागतिक बँकेच्या मते, ग्रामीण विकास म्हणजे ग्रामीण समूहातील विशेषता गरीब लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात सुधारणा घडवून आणण्यासाठी निश्चित केलेली रणनीती होय.

३) रॉबर्ट चेंबर्सच्या मते, ग्रामीण विकास म्हणजे समाजातील एका विशिष्ट गटाला विकसित करण्याची युक्ती आहे म्हणजेच ग्रामीण भागातील महिला पुरुष व मुले यांना लागणाऱ्या गोष्टींची पूर्तता होय.[५]

वरील व्याख्यांवरून ग्रामीण विकासाची काही उद्दिष्टे लक्षात येतात. ग्रामीण भागात वाढीव उत्पादन आणि उत्पादकता साध्य करणे, ग्रामीण भागातील सामाजिक आणि आर्थिक विकास वाढवणे, ग्रामीण भागाला विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेणे, कुटिर उद्योग हस्त उद्योग यांच्या माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्था सुदृढ करणे, ग्रामीण भागातील वाढते स्थलांतर थांबविणे, ग्रामीण भागातील लोकांना राजकीय प्रक्रियेत जोडणे. वरील उद्दिष्टे लक्षात घेऊन भारत सरकारने ग्रामीण विकास साध्य करण्यासाठी पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून १९७९ ते १९८२ या कालखंडामध्ये ग्रामीण विकास मंत्रालयाची स्थापना केली. यासोबतच राज्यस्तरावर एक स्वतंत्र ग्रामीण विकास

मंत्रालय स्थापन करण्यात आले. या मंत्रालयाच्या माध्यमातून आज ताक आतपर्यंत ग्रामीण विकास केंद्रस्थानी ठेवूनच ग्रामीण भागाचा विकास करण्याच्या दृष्टिकोनातून इंदिरा आवास योजना, सुवर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, महात्मा गांधी राजकीय ग्रामीण रोजगार योजना जलस्वराज्य प्रकल्प राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्ती अभियानाचाच एक भाग म्हणून दीन दयाळ उपाध्याय - ग्रामीण कौशल्य योजना अनुसूचित जमातीच्या बचतगटांना कुक्कुटपालन व्यवसाय करण्यासाठी आर्थिक मदत या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास करण्याचा प्रयत्न सुरू आहे

**पंचायतराजः-**

पंचायत राज ही दक्षिण आशियातील मुख्यतः भारत, पाकिस्तान आणि नेपाळमधील राजकीय व्यवस्था आहे. ही खरं तर भारतीय उपखंडातील स्थानिक सरकारची सर्वात जुनी व्यवस्था असून ही भारतातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाची एक प्रणाली आहे. पंचायतींचे वर्णन प्राचीन भारतीय ग्रंथ "ऋग्वेद" मध्ये "सभा" आणि "समिती" या स्वरूपात आढळते. पंचायत म्हणजे गावातील समाजाने निवडलेल्या आणि स्वीकारलेल्या पाच (पंच) ज्ञानी आणि आदरणीय वडिलांची सभा होय. पंचायत राजचे तत्त्वज्ञान ग्रामीण भारताच्या परंपरा आणि संस्कृतीत खोलवर रुजलेली आहे. ती मुळीच नवीन संकल्पना नाही.[६] 'राज' म्हणजे राज्य करणे आणि 'पंचायत' म्हणजे पाच जणांची सभा. पंचायती राज ही एक राजकीय व्यवस्था आहे जिथे व्यक्ती आणि गावांमधील वाद मिटवण्यासाठी स्थानिक समुदायाद्वारे ज्ञानी आणि वडीलधारी व्यक्तींची निवड केली जाते. 'पंचायत राज' हा शब्द स्वतंत्र भारतात श्री बलवंतराय गोपालजी मेहतांचे लोकशाही विकेंद्रीकरणातून उदयाला आला आहे. शाब्दिक, दृष्टीने पंचायत राज शब्द हिंदी भाषेचे दोन शब्द पंचायत आणि राज यापासून मिळून बनलेला आहे. त्याचा अर्थ होतो पाच व्यक्तींच्या प्रतिनिधींचे शासन होय.[७]

पंचायत राज व्यवस्था हे भारतीय लोकशाहीचे वैशिष्ट्य आहे. स्थानिक स्वराज्य संस्था लोकांना निर्णय प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी देते. कोणत्याही लोकशाहीत राजकीय विकेंद्रीकरण हे लोकांच्या कल्याणासाठी असते. पंचायत राज व्यवस्थेने देशांत विलक्षण बदल घडवून आणले आहे. भारतीय जनतेला लोकशाहीशी जोडण्यात पंचायत राज व्यवस्थेने मदत केली. पंचायत राज व्यवस्था ही गावाची संस्था आहे. या व्यवस्थेमध्ये गावातील प्रत्येक नागरिक, दलित, आदिवासी,स्त्री-पुरुष, आबालवृद्ध, अपंग सहभागी होऊ तिचे कार्य व सर्वांच्या हिताच्या दृष्टिकोनातून चालवीत असतात.ग्रामीण भागात सामाजिक समता आर्थिक विकास आणि लोकशाहीच प्रशिक्षण याच पंचायत राज व्यवस्थे मधून ग्रामीण भागातील लोकांना मिळते. ग्रामीण भागातील जोड रस्ते, पाझर तलाव वैद्यकीय सेवा, शाळातील वर्गांची बांधणी, समाज कल्याणाचे कार्यक्रम युवा प्रशिक्षण या कार्यक्रमांमधून ग्रामीण लोक जीवनात बदल घडून येत आहेत.[८]

**पंचायतराज व्यवस्थेचा विकासः-**

प्राचीन काळी गावाचा कारभार हा पंचायत मार्फत चालत असे, पंचायतीच्या प्रमुखास गोपा असे संबोधल्या जात असे. वैदिक काळात ग्रामसभा असल्याचे प्राचीन वांग्मय यावरून आपणास ज्ञात होते ग्रामसभा आणि त्यांचे कामकाज

पाहणार या समित्या यांचाही उल्लेख प्राचीन वागण्यात आढळून येतो गावातील लोकांनी गावाचा कारभार पाणी तंटे आणि संघर्ष गावातील ज्ञानवृद्ध आणि अनुभवी अशा ज्येष्ठ लोकांकडून मिटविणे अशा प्रकारची कार्य करीत असायचे. वेदकाळा मधे ग्रामपंचायतीचा उल्लेख समिती या नावाने सापडतो. गावाच्या प्रमुखाला ग्रामीण म्हणून संबोधले जात असायचे.मोगल काळात गावातील प्रशासन चालविण्यासाठी कोतवाल, सरपंच, मुखिया ही तीन पदे निर्माण करण्यात आली. ब्रिटिश राजवटीत घडून आलेला पंचायतराज व्यवस्थेचा विकास हा त्या त्या काळामधील परिस्थिती, राजकीय गरज आणि अधिकार स्थित व्यक्तीची वैयक्तिक श्रद्धा विश्वास यांचा एकत्रित परिणाम आहे. ब्रिटिश शासन काळात लॉर्ड रिपन या गव्हर्नरनी लोकांमध्ये राजकीय जागृती निर्माण व्हावी व त्यांच्यात सकारात्मक बदल व्हावा या उदारमतवादी हेतुने स्थानिक स्वराज्य संस्थेचा कायदा केला.त्यात सर्व प्रांतात व्दिदल पध्दतीचा, तालूका स्तरवर लोकल बोर्डची, जिल्हा स्तरावर जिल्हा बोर्ड, शहरी भागासाठी नगरपालिकांची निर्मितीचा समावेश होता.१९०७ मध्ये रॉयल कमिशनने रॉयल विकेंद्रीकरण आयोगाची स्थापना करून प्रत्येक गावासाठी एक ग्रामपंचायत, नागरी भागासाठी नगरपालिकेची स्थापना, गावपातळीवर लोकनियुक्त सदस्यांमार्फत स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार केला जावा आणि त्यामध्ये निर्वाचित सदस्यांचे बहुमत असावे अशा शिफारशी केल्या. १५ ऑगस्ट १९४७ मध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर स्थानिक स्वायत्त शासनाचे उत्साहात एका नव्या अध्यायाला प्रारंभ झाला. २६ जानेवारी १९५० ला भारतात नवीन निर्मित राज्यघटना प्रवर्तित झाली. राज्यघटनेच्या भाग ४ मार्गदर्शक तत्वांमध्ये कलम ४० नुसार ग्रांपचायतीचा उल्लेख करण्यात आला.

देशाचा जलद आर्थिक विकेंद्रीत विकास साध्य करण्यासाठी केंद्र शासनाने नियोजनबद्ध १९५१मध्ये प्रथम पंचवार्षिक योजना कार्यान्वित केली त्यामध्ये ग्रामीण पुनर्रचना व स्थानिक शासनाला महत्त्वाचे स्थान दिले गेले जण सहभागातून लोकांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी अमेरिकेच्या साहाय्याने दोन आक्टोंबर १९५२ रोजी सामुदायिक विकास योजना सुरू करण्यात आली. या योजनेला अनुसरूनच एका वर्षाने राष्ट्रीय विस्तार योजना तयार केल्या केली परंतु या दोन्ही योजनेला लोकांचा अपेक्षित असा पाठिंबा न मिळाल्याने या दोन्ही योजना अपयशी ठरल्या. या योजनांचे मूल्यमापन करण्यासाठी केंद्र सरकारच्या पुढाकाराने बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली या समितीने त्रिस्तरीय पंचायत राजची स्थापना करण्याची शिफारस केली. याच शिफारसीच्या आधारावर राजस्थान येथील नागौर या ठिकाणी देशातील पहिली ग्रामपंचायत पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या हस्ते स्थापन करण्यात आली. या समितीच्या शिफारशी वरूनच देशातील विविध घटक राज्यात पंचायतराज संस्था स्थापन करण्यात आल्या. पंचायती राज हा शब्द ग्रामीण स्थानिक स्वराज्य व्यवस्थेला सूचित करतो. तळागाळातील लोकशाहीची उभारणी करण्यासाठी भारतातील सर्व राज्यांतील राज्य विधानमंडळांद्वारे त्याची स्थापना केली गेली. सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या दिशेने टाकलेले हे सर्वात महत्त्वाचे पाऊल आहे.समितीने आर्थिक विकेंद्रीकरणाच्या गरजेवर भर दिला.

'बलवंतराय मेहता समिती' च्या शिफारशींच्या आधारे स्थापन झालेल्या पंचायत राज व्यवस्थेत अनेक उणिवा निर्माण झाल्या होत्या, या उणिवा दूर करून शिफारशी करण्यासाठी अशोक मेहता यांच्या अध्यक्षतेखाली डिसेंबर १९७७ मध्ये 'अशोक मेहता समितीची' स्थापना करण्यात आली. ही समिती केंद्र सरकारने स्थापन केली होती. १९७७ मध्ये केंद्रात सत्तांतर झाले आणि जनता पक्षाचे सरकार आले. या पाश्र्वभूमीवर पंचायत राज व्यवस्थेचे मूल्यमापन करण्यासाठी नवीन सरकारने १९७७ च्या अखेरीस ही समिती नियुक्त केली. या समितीने १९७८ मध्ये आपला अहवाल सरकारला सादर केला. या समितीने पंचायत राजव्यवस्था द्विस्तरीय असावी ही महत्त्वाची शिफारस केली. यात जिल्हा स्तरावर जिल्हा परिषद असावी. तसेच जिल्हा स्तरानंतर पंचायत समिती व ग्रामपंचायत या दोन संस्थाऐवजी मंडळ पंचायतीची स्थापना करावी. मंडळ पंचायत ही ग्रामपंचायतीपेक्षा मोठी असावी.अशाप्रकारच्या १३२ शिफारसी अशोक मेहता समितीने केल्या होत्या.[९]

जी. व्ही. के. राव समिती : ही समिती १९८५ मध्ये स्थापन करण्यात आली. या समितीने नियोजन आणि विकासासाठी जिल्हा हा योग्य घटक मानून विकास कार्यक्रमाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी जिल्हा परिषदेवर सोपवावी, लोक प्रतिनिधींच्या सहभागातून आर्थिक व सामाजिक विकास साधला जावा.पंचायत राज संस्थेच्या निवडणुका वेळेवर घेण्यात याव्यात, जिल्हाधिकार्यापेक्षा वरिष्ठ असलेल्या IAS अधिकाऱ्याची जिल्हा विकास आयुक्त म्हणून नेमणूक करावी.[१०] अशा ४० शिफारसी केल्या.सन १९८६ मध्ये श्री. राजीव गांधी यांच्या सरकारने ग्रामीण विकास व राष्ट्रबांधणीच्या विधायक कार्यात पंचायत राज संस्थांना भरीव योगदान कसे करता येईल. याबाबत उपाययोजना सुचविण्यासाठी डॉ.एल.एम.सिंघवी यांच्या अध्यक्षतेखाली सिंघवी समिती स्थापन केली. या समितीने पंचायत राज संस्था ना घटनात्मक दर्जा देण्याची त्यासोबतच पंचायत राज्याला प्रतिष्ठा, राज्यघटनेत नवीन प्रकरणाचा समावेश, ग्रामस्तरावर ग्रामपंचायतीची स्थापना, ग्रामपंचायत सदस्यांची ग्रामसभेत कडून निवड, पंचायत राजच्या नियमित वनी पक्ष निवडणुका होण्यासाठी घटनात्मक तरतुदी, ग्रामपंचायतीची स्थापना या स्वरूपाच्या बऱ्याच या शिफारशी यापूर्वीच्या काही समित समित्यांनी केलेल्या शिफारशी प्रमाणेच शिंगवी समितीने शिफारशी केल्या.[११]
१९८८ मध्ये श्री.पी. के. गुंथन समितीनेजिल्हा नियोजन व जिल्ह्यातील प्रशासकीय संरचना निर्माण करण्याच्या उद्देशाने देशातील पंचायतराज संस्थांची पुनर्रचना करण्यात यावी, पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा व अधिकार देण्यात यावेत, पंचायतराज ची त्रिस्तरीय व्यवस्था जिल्हा, तालुका व गाव या तीन स्तरावर करावी,न्याय पंचायत ची स्थापना, पंचायत राज संस्था बरखास्त झाल्यास सहा महिन्याच्या आत पंचायत संस्थांच्या निवडणुका देण्यात याव्यात.या शिफारसी केल्या.

पंचायतराज व लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण प्रवासास प्रारंभ करणारी घटना म्हणजे भारतीय राज्यघटनेतील ७३ वी घटनादुरुस्ती विधेयक होय. ७३ वी घटनादुरुस्ती विधेयक तत्कालीन पंतप्रधान श्री. पी. व्ही. नरसिंह राव यांच्या कारकिर्दीत १९९२ मध्ये मान्य झाले. व त्याची अंमलबजावणी २४ एप्रिल १९९३ मध्ये झाली. या घटनादुरुस्तीने पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा मिळाला. ग्रामसभा व ग्रामपंचायत यांची निर्मिती रचना

अधिकार, अधिकार क्षेत्रे, कार्य, निधी पंचायत राज यासाठी अर्थ, मंडळ हिशेब तपासणी, निवडणूका, निवडणूक यंत्रणा इत्यादींची तरतूद केली गेली. या घटनादुरुस्ती नुसार "पंचायती" या शिर्षकाखाली संविधानात भाग ९ अ हा समाविष्ट केला. त्यामध्ये कलम २४३ (ए) ते २४३ (ओ) मध्ये पंचायत राजसंबंधी आवश्यक तरतुदी करण्यात आल्या.व २९ विषय ११ व्या परिशिष्टात जोडण्यात आले. यामुळे पंचायत राज ला संवैधानिक दर्जा प्राप्त झाला. कलम २४३ (बी) नुसार गाव पातळीवर ग्रामपंचायत, तालुका पातळीवर पंचायत समिती जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद याप्रकारे देशात त्रिस्तरीय पंचायत राज अस्तित्वात आली. कलम (डी-१) नुसार पंचायत राजच्या राजस्थानमध्ये अनुसूचित जाती जमातीच्या लोकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा ठेवण्यात आल्या आहेत विविध मतदारसंघात ते आळीपाळीने ठेवले गेले. त्यासोबतच १/३ राखीव जागा याच प्रवर्गातील महिलांसाठी राखीव ठेवल्या. (सध्या ५०% जागा महिलांसाठी राखीव केल्या.) कलम २४३ (इ) नुसार पंचायत राजसंस्थांचा कार्यकाळ पाच वर्ष निश्चित करून भारतातील सर्व घटक राज्यांच्यापंचायत राज संस्थांच्या कार्यकाळात समानता आणण्यात आली.कलम २४३ (एच) सार पंचायत राज संस्थांच्या वित्तीय जबाबदारी राज्य विधिमंडळावर सोपविण्यात आली.[१२] यासोबतच शहरी पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा मिळावा म्हणून ७४ वी घटनादुरुस्ती करण्यात आली. ७४ वे घटनादुरूस्ती विधेयक १९९२ रोजी मंजूर झाले. त्याची अंमलबजावणी १ जून १९९३ पासून करण्यात आली. या घटनादुरुस्तीने भारतीय राज्यघटनेत नगरपालिका शिर्षकाखाली ९-अ या भागाचा समावेश करण्यात आला त्या भागात २४३ (पी) ते २४३ (झेड, जी) ही कलमे व १२ वे परीशष्ट जोडले.या परिशिष्टात नगरपालिका संस्थांना करावी लागणारी १८ कार्यविषयांची सूची दिलेली आहे. कलम २४३ (क्यु) नुसार प्रत्येक राज्यात तीन नागरी शहरी स्थानिक स्वराज्य संस्था स्थापन करण्यासाठी त्यात नगरपंचायत नगरपालिका महानगरपालिका यांचा समावेश केला.

कलम २४३ (आर) नुसार प्रत्यक्ष निवडणुकीतून जागा भरण्यासाठी प्रत्येक नगरपालिका क्षेत्राची प्रभागात प्रादेशिक मतदारसंघांमध्ये विभागणी केली गेली. त्यासोबतच प्रभाग समित्यांची स्थापना करण्यासंदर्भातील तरतुदी केल्या आहेत. कलम २४३ (टी) नुसारनगरपालिका संस्था सदस्य व पदाधिकारी या दोन्ही स्तरावर आरक्षणाची तरतूद करण्यात आली. प्रामुख्याने अनुसूचित जाती जमातीलालोकसंख्येच्या प्रमाणात आरक्षण व त्या पैकी १/३ पेक्षा कमी नाही, इतके महिला रक्षणाची तरतूद केली गेली त्यासोबत मागासवर्गीयांसाठी राखीव जागांच्या संदर्भात आरक्षणाची भूमिका राज्याचे विधिमंडळ निश्चित करेल याबरोबरच महिलांना दोन-तृतीयांश अपेक्षा कमी आरक्षण असणार नाही.अशी तरतूद करण्यात आली होती सन २०११ च्या ११० व्या घटना दुरुस्तीने ही मर्यादा १/२ किंवा ५०% पेक्षा कमी नाही एवढी करण्यात आली आहे. कलम २४३ (यु) नुसार नगरपालिका यांचा कार्यकाल निवडणुकीच्या नंतर पहिल्या बैठकीपासून पाच वर्षाचा केला परंतु त्यापेक्षा कमी कालावधीत त्यांना बरखास्त केले जाऊ शकेल बरखास्ती नंतर सहा महिन्याच्या आत निवडणुका घेणे बंधनकारक राहील अशी तरतूद आहे.[१३]

**जळगांव जिल्ह्यातील पंचायत राजसंस्थाः-**

उत्तर महाराष्ट्रातील ज्याला खानदेश असे म्हटले जाते, हा जळगाव जिल्हा आहे. सातपुड्याच्या रांगेतील आदिवासींचे वास्तव्य; भारतातील प्रमुख नदी असणा-या् तापीचा जिल्ह्यातून जाणारा प्रवाह, मूलभूत सोयीसुविधा सशक्त करणारे रेल्वेचे जाळे आणि आधुनिक शेतीचे -सिंचनाचे यशस्वी प्रयोग या जिल्ह्याची अशी अनेक वैशिष्ट्ये सांगाता येतील. जळगाव जिल्ह्याने सातवाहनांपासून, मराठे व त्यांनतर इंग्रजांपर्यंत अनेक राजवटी पाहिल्या. १९०६ मध्ये जेव्हा खानदेशाची विभागणी झाली तेव्हा हा पूर्व खानदेश सध्याचे जळगाव बनला. तदनंतर १९६० मध्ये महाराष्ट्र राज्याच्या निर्मिती बरोबर जळगाव राज्यात दाखल झाला. जळगाव जिल्हा महाराष्ट्राच्या उत्तरेकडील जिल्हा आहे. या जिल्ह्याच्या उत्तरेला मध्य प्रदेश राज्य, पूर्वेला बुलढाणा, दक्षिणेला औरंगाबाद जिल्हा, नैऋत्येला नाशिक, पश्चिमेला धुळे जिल्हा - असे जिल्हे वसलेले आहेत. जिल्हा परिषद जळगावची स्थापना १९६२ मध्ये झाली. बलवंतराय मेहता समितीने (१९५८) ग्रामीण विकासात ग्रामीण जनतेला सहभागी करून घेण्यासाठी त्रिस्तरीय पंचायत राज पध्दतीची शिफारस केलेली आहे. त्यास अनुसरून महाराष्ट्र शासनाने दि. १ मे १९६२ रोजी महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चा कायदा सहमत केला व जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद, गट पातळीवर पंचायत समिती व गाव पातळीवर ग्राम पंचायत अशा रीतीने त्रिस्तरीय पंचायत राज ची स्थापना केली.. (महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या कायदा, १९६१, नियम ९ (१) अन्वये जिल्हा परिषद प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे निवडुन आलेले परिषद सदस्य व्यक्तींनी मिळून बनलेली आहे.

जळगाव जिल्ह्यात शहरी पंचायराज संस्था- महानगरपालिका- १, नगरपालिका- १३, ( भुसावळ, अमळनेर, चाळीसगांव, चोपडा, पाचोरा, फैजपूर, यावल, रावेर, सावदा, पारोळा, धरणगाव, एरंडोल,जामनेर) आणि ग्रामीण पंचायत राजव्यवस्था- जिल्हा परिषद- १, पंचायत समित्या- १५, (चाळीसगांव, भडगाव, पारोळे, अमळनेर, चोपडा, एरंडोल, जळगाव, पाचोरा, जामनेर, भुसावळ, यावल, रावेर, एदलाबाद/ मुक्ताईनगर, बोदवड, धरणगाव.) ग्रामपंचायत- जिल्ह्यात जिल्हा परिषदेचे ६८ मतदारसंघ असून पंचायत समितीचे १३६ मतदारसंघ आहेत. २०११ च्या आकडेवारीनुसार, जळगावची लोकसंख्या ४,२२९,९१७ आहे. ज्यामध्ये अनुक्रमे पुरुष आणि महिलांची संख्या अनुक्रमे २,१९७,३६५ आणि २,०३२,५५२ आहे. २००१ च्या जनगणनेनुसार, जळगावची लोकसंख्या ३,६८२,६९० इतकी होती, त्यापैकी पुरुष १,०९५९३ आणि उर्वरित १७,७७,१९७ महिला होत्या. महाराष्ट्राच्या एकूण जनगणनेनुसार जळगाव जिल्ह्याची लोकसंख्या ३.७६ टक्के आहे. २००१ च्या जनगणनेनुसार, जळगाव जिल्ह्याची ही आकडेवारी महाराष्ट्र लोकसंख्येच्या ३.८० टक्के होती.[१४] जळगांव जिल्ह्यात गावांची संख्या १५१३ असून शहरांची संख्या २० आहे. २००१ च्या जनगणनेनुसार जिल्ह्यातील एकुण लोकसंख्येशी अनुसुचीत जाती व अनुसुचीत जमातीचे प्रमाण अनुक्रमे ९.२०% व १४.२९% आहे.[१५]

**पंचायत राजव्यवस्थेची भुमिकाः-**

ग्रामविकासाची संकल्पना बघितल्यानंतर असे दिसून येते की, केंद्र आणि राज्य शासन ग्रामीण विकासाच्या दृष्टिकोनातून ज्या काही वेगवेगळ्या योजना, कार्यक्रम आणि धोरण ठरवितात त्या सगळ्यांची अंमलबजावणी पंचायत राज व्यवस्था करीत असते. ग्रामीण भागात अत्यावश्यक सेवा आणि सुविधा, शेतकऱ्यांना बी-बियाणे , तसेच शेतीसाठी उपयुक्त सुधारित आणि नवीन तंत्रज्ञानाची माहिती, ग्रामीण भागात शाळा व ग्रंथालये स्थापना, ग्रामीण भागात प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि रुग्णालये, तसेच वेळोवेळी साथींचे रोग निवारणासाठी प्रतिबंधक लसींचा कार्यक्रम राबविणे. ग्रामीण भागात अनुसूचित जाती-जमातीच्या लोकांसाठी विविध विकास योजनांची अंमलबजावणी, आदिवासी मुलांसाठी आश्रमशाळा चालविणे तसेच आदिवासी विद्यार्थ्यांसाठी मोफत वसतिगृह स्थापना, ग्रामीण रोजगार राबविणेसाठी लघुउद्योग सुरु करण्यासाठी उद्योजकांना प्रोत्साहन, ग्रामीण भागात पूल, रस्ते बांधणे व त्यांची देखभाल करणे तसेच इतर सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून रोजगारनिर्मिती पंचायत राजच्या माध्यमातून केले जाते. म्हणून पंचायत राज व्यवस्था ग्रामीण विकासाच्या योजना आणि कार्यक्रम किती कार्यक्षमपणे आणि पारदर्शकपणे राबविते व त्यांची अंमलबजावणी करते, यावरच ग्रामीण भागाचा विकास आहे.

जळगाव जिल्ह्यात मुख्य व्यवसाय शेतीचा आहे. त्यामध्ये प्रामुख्याने केळीचे उत्पादन घेतले जात असल्यामुळे पंचायत राज मार्फत कृषी विकासाच्या विविध योजना व कार्यक्रम राबवले जाते. जिल्हयातील सर्व शेतक-यांना शेती विषयक औजारे अनुदानावर उपलब्ध करुन शेतीत यात्रिंकीकरण वाढविण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांना शेती साहित्याचे वाटप, खाते व बियाणे, औषधी, कृषी प्रशिक्षणाचे कार्यक्रम ,नविन राष्ट्रीय बायोगॅस व सेंद्रीय खत व्यवस्थापन, या योजना दिल्या जातात. अनुसुचित जाती व जमातींच्या लोकांसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना अंतर्गत अनुसुचित जाती/नवबौध्द शेतक-यांचे उत्पन्न वाढवुन त्यांचे जीवनमान उंचवण्यासाठी व बिरसा मुंडा कृषि क्रांती अंतर्गत- अनुसुचित जमातीतील उत्पन्न वाढवुन त्यांचे जीवनमान उंचवण्यासाठी शेती विषयकबाबींचे १०० टक्के अनुदानावर नवीन विहीर,जुनी विहीर दुरुस्ती, इनवेल बोरिंग,पंपसंच/सोलर पंप संच, शेततळयांचे प्लास्टीक अस्तरीकरण, सुक्ष्म सिंचन संच अ. ठिबक संच ब,पीव्हीसी पाईप इत्यादी योजना पुरविल्या जाते.[१६] यासोबतच ग्रामीण भागात शेती व्यवसायाला पुरक पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय जळगाव जिल्ह्यात केला जातो. शेतीसाठी सेंद्रिय खतांची आवश्यकता असते हे. या खतासाठी व दुधासाठी ग्रामीण भागात गाय, म्हैस,बैल, शेळ्या,मेंढ्या इत्यादी जनावरे पाडली जातात. त्यांचे संवर्धन होण्यासाठी पंचायतराज मार्फत अनेक योजना व कार्यक्रम राबवले जाते. जनावरांच्या संवर्धनासाठी दवाखाने चालविणे, मोफत औषधोपचार करणे, सुधारित पैदांशीच्या जनावरांचे वितरण करून जोपासना करणे, गुरांना लसीकरण, औषधोपचारची व्यवस्था करणे, जनावरांवरल लंपी चमरोग आजाराबाबत शेतक-यांना जनावरांची योग्य प्रकारे काळजी घेण्याबाबत प्रशिक्षण देणे ही कार्य पंचायत राजच्या माध्यमातून पार पाडली जातात. २०२१-२०२२ मध्ये विशेष घटक योजने अंतर्गत ७५ टक्के अनुदानावर अनुसूचित जातीच्या ३८ लोकांना शेळी वाटपासाठी २९२१०४२ रुपये तर जनावरांच्या खाद्य वाटपासाठी ३४९८६० रुपये[१७] वितरीत केले.

विशेष घटक योजने अंतर्गत अनुसूचित जाती/ नवबौद्ध लोकांना दुभत्या जनावरांच्या अनुदानासाठी व शेतकऱ्यांच्या जमिनीवर वैरण विकासासाठी वैरण विकास योजना राबविली जाते. यातुनच कृषी विकासात पंचायत राजची भुमिका दिसून येते.

जिल्ह्याच्या ग्रामीण भागात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाची व्यवस्था पंचायतराज मार्फतच केली जाते. जळगाव जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील प्रत्येक गावात जिल्हा परिषदेच्या शाळा स्थापन केल्या आहेत. या शाळेचे व्यवस्थापन, पर्यवेक्षण, नियंत्रण,, शैक्षणिक साहित्याचा पुरवठा, आणि शिक्षकांच्या निवडीपासून त्यांच्या व्यवस्थापनाचे सर्व कार्य जिल्हा परिषदेमार्फत पंचायत राज व्यवस्था करत असते.जिल्ह्यात सर्व शिक्षा अभियानाची अंमलबजावणी 2002 पासून केली. मोफत पाठ्यपुस्तक योजनेअंतर्गत २०२२-२०२३ मध्ये जिल्ह्यातील शंभर टक्के मुले शाळेत दाखल होऊ होऊन नियमित उपस्थित राहून गुणवत्तापूर्ण शिकतील यासाठी पहिली ते आठवी च्या शासकीय शाळा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा अनुदानित शाळा तिल मराठी उर्दू हिंदी व इंग्रजी माध्यमांच्या ४१६४६२ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तक दिले. यासोबतच सर्व मुली, अनुसूचित जाती- जमाती, दारिद्र्रेषेखालील मुले यांना दोन गणवेश संच घेण्यासाठी सहाशे रुपये प्रमाणे १५४७४४ विद्यार्थ्यांना ९२८४४०० रुपयांची मदत केली.[१८] माध्यमिक वर्गात शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना एबीसी योजनेअंतर्गत हि माफीची सवलत, आदिवासी विद्यार्थ्यांना विद्यावेतन, माजी सैनिकांच्या मुलांना शैक्षणिक सवलती, ग्रामीण भागातील हुशार व होतकरू विद्यार्थ्यांना खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती, बारावी पर्यंत शिकणाऱ्या मुलींना मोफत शिक्षण योजना राबविण्यात आल्या. जळगाव जिल्ह्यातील १६४ केंद्रांना स्टेशनरी, झेरॉक्स, विज बिलासाठी अनुदान देण्यात दिले.प्राथमिक व माध्यमिक शाळांतील भौतिक गरजा पूर्ण करण्यासाठी व शाळेत योग्य शैक्षणिक वातावरण तयार करण्यासाठी १८६५ प्राथमिक शाळांना ३१३८२५०० तर माध्यमिक शाळांना ८०५००० अनुदान वितरीत केले.[१९]

मागासवर्गीयांचे सामजिक व शैक्षणिक जीवनमान उंचावणे व त्यांच्या उन्नतीसाठी वेगवेगळया योजना व उपक्रमाव्दारे तसेच शासनाच्या धोरणात्मक आदेशानुसार योजना, अनुसूचित जाती व नवबौध्द लोकांसाठी दलित वस्त्यामध्ये मुलभुत सुविधा जसे- पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, सिमेंट रस्ते/नाली बांधकाम, स्वच्छता विषयक सोयी, मलनिस्सारण, वीज, वस्तीला जोडणारे रस्ते, समाज मंदिर इत्यादी व्यवस्था करुन दलित वस्तीची सर्वांगीण विकास करण्यासाठी प्रयत्न, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, सिमेंट रस्ते/नाली बांधकाम, स्वच्छता विषयक सोयी, मलनिस्सारण, वीज, वस्तीला जोडणारे रस्ते, समाज मंदिर, इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकण घेणा-या अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इ. ८ वी ते १० वी मध्ये शिकण घेणा-या अनुसूचित जातीच्या मुलींच्या गळतीचे प्रमाण कमी व्हावे या उद्देशाने सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना समाजातील जातीयता नष्ट व्हावी म्हणून आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन व अर्थसहाय्य विवाहीत जोडप्यांना दिले जाते. अपंगाना स्वतःच्या पायावर उभे राहून स्वावलंबी व्हावे व त्यांना समाजाचा कृतीशील घटक म्हणून जगता यावे यासाठी अपंग विद्यार्थांना शिष्यवृत्ती, ग्रामीण भागातील मागासवर्गीय प्रशिक्षीत महिलांना शिलाईयंत्र/पिकोफॉल मशीन,मिरचीकांडप ,मिनी पिठाची गिरणी, शाळेत जाणा-

या मुलींना सायकल पुरवठा, हगणदारी मुक्त गावे,संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, महात्मा गांधी तंटा मुक्त अभियान,पंचायत राजच्या माध्यमातून केले जाते.

**समारोपः-**

पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, कृषी, आरोग्य, महिला सक्षमीकरण, बालकल्याण, स्वच्छता, आधुनिक तंत्रज्ञान सर्व कार्य आणि ७३ व्या घटना दुरुस्तीतील ११ व्या परिशिष्टातील २९ विषयांचा अनिवार्य कार्यामध्ये समावेश केल्यामुळे ग्रामीण विकासाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने पंचायत राज ची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्यामुळे पंचायत राज व्यवस्था ग्रामीण विकासाचे एकमेव साधन असल्याचे स्पष्ट होते. या सर्व कार्यातून ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास होतो. परंतु या सर्व कार्याची अंमलबजावणी पंचायत राज व्यवस्था कार्यक्षम व पारदर्शक पद्धतीने करते काय? हा एक मोठा प्रश्न पंचायतराज व्यवस्थेवर निर्माण होतो. कारण दरवर्षी केंद्र व राज्य सरकार ग्रामीण विकासासाठी पंचायत राजला हजारो कोटी रुपये वेगवेगळ्या योजना व कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी देते. परंतु त्या प्रमाणात ग्रामीण भागाचा विकास झालेला दिसून येत नाही. ज्या गावांमध्ये पंचायत राज व्यवस्थेच्या माध्यमातून पंचायत राज व्यवस्थेच्या घटकांनी कार्यक्षम व पारदर्शक या ग्रामीण विकास योजना व कार्यक्रमाची अंमलबजावणी केली त्या गावाचा विकास झाल्याचे दिसून येते. म्हणून ग्रामीण भागाचा विकास करायचा असेल तर पंचायत राजव्यवस्थेचे सक्षमीकरण करून कार्यक्षम व पारदर्शक व्यवहार करणे आवश्यक आहे.

**संदर्भः-**


१) https://vishwakosh.marathi.gov.in.

२) पाटील वा. भा. पंचायत राज, प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव २०१२ पृ.४५

३)गवई,चव्हाण.भारतीय संविधानातील तरतूदी आणि स्थानिक स्वराज्य संस्था,प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव २०१७ पृ.२२०

४) पाटील दिलीप श, ग्रामीण विकास,दुर व मुक्त अध्ययन संस्था मुंबई विद्यापीठ,मुंबई,२०२० पृ.३

५) देसाई संभाजी ग्रामीण समाज काल, आज आणि उद्या प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव २०१५ पृ.२३०

६) Mrs. Vani H1, Prof. Ravindranath N. Kadam2 research paper published in international Journal of Science and Management Volume No.06 Issue No.06 June 2017

७) पाटील वा. भा. पंचायत राज, प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव २०१२ पृ. ८

८) नान्देडकर व्ही.जी.पंचायतीराज एक विश्लेषणात्मक परामर्श, के सागर पब्लिकेशन्स पुणे २००४ पृ. ६७

९) https://en.wikipedia.org/wiki/Ashok_Mehta_Committee

१०) शिरसाठ शाम ,बैनाडे भगवानसिंग पंचायतराज आणि नागरी प्रशासन, विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगाबाद २०१४ पृ.५२

११)पाटील वा. भा. पंचायत राज, प्रशांत पब्लिकेशन्स जळगाव २०१२ पृ. ९४

१२) https://www.india.gov.in/my-government/constitution-india/amendments/constitution-india-seventy-third-amendment-act-1992

१३) https://www.india.gov.in/my-government/constitution-india/amendments/constitution-india-seventy-fourth-amendment-act-1992

१४) https://jalgaon.gov.in/demography/

१५) https://mahasdb.maharashtra.gov.in/SDB_Reports/Population_Census/HTML/Districtwise

१६) https://mr.wikipedia.org/wiki/जळगाव_जिल्हा_महत्त्वाची_पिके

१७) http://zpjalgaon.dikshanttechnologies.in/wp-content/uploads/2020/07/RTI-DAHO.pdf

१८)http://zpjalgaon.dikshanttechnologies.in/wp-content/uploads/2020/07/RTI-Education-_Secondary.pdf

१९)http://zpjalgaon.dikshanttechnologies.in/wp-content/uploads/2020/07/RTI-Education-Primary.pdf